| MHPU240005772022 | **नियमित दिवाणी दावा क्र. ७८/२०२२**<br>**जानकू नवले वि. विलास नवले** |
| --- | --- |

## <u>निशाणी क्रमांक २१ वरील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र. २ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेकामी झालेला विलंब माफ करण्याकरीता दाखल केला आहे.

**०२.** प्रतिवादी यांनी अर्जास हरकत घेतली आहे.

**०३.** उभयपक्षकारातर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**०४.** उभयपक्षकारातर्फे केलेल्या युक्तीवादाचा अभिलेखाशी विचार करता असे दिसुन येते की, दावा वाटपासाठी आहे. प्रतिवादी क्र. २ हा दिनांक १७.०७.२०२३ रोजी मयत झालेला आहे. त्याबाबत उभयपक्षकारा दरम्यान दुमत नाही. त्याचा मृत्यूचा दाखला निशाणी २६ सोबत दाखल केलेला आहे. प्रस्तुतचा अर्ज दिनांक २०.०२.२०२५ रोजी म्हणजेच दीड वर्षानंतर दाखल केलेला आहे. अर्जात दिलेले कारण संयुक्तिक वाटत नाही. परंतु, न्यायाच्या दृष्टीने व दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यासाठी अर्ज मंजूर करणे उचित होते. या सर्व

बाबींचा विचार करुन पुढीलप्रमाणे आदेश करण्यात येतो –

> अर्ज, रक्कम रु. ९००/– प्रतिवादी यांना अदा करण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

Digitally signed by PATIL AVINASH MADHUKAR
Date: 2025.06.26 16:38:42 +0530

(श्री. अविनाश म. पाटील)

दिनांक:–  २६.०६.२०२५

दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file order are same word for word as per original order.

| | |
|---|---|
| Name of Steno | : Gaurav A. Bobade. |
| Name of Court | : Shri. Avinash M. Patil.<br>Civil Judge Junior Division,<br>Ghodegaon. |
| Dictated and typed on | : 26.06.2025. |
| Corrected on | : 26.06.2025. |
| Signed on | : 26.06.2025. |